तरुण भारत
Akola Main | 2024-02-27 | Page- 2
epaper.tarunbharat.net

# आता ग्रामसेवक भेटणार गावातच

## ग्रामपंचायतीत लागणार उपस्थितीचे वेळापत्रक

## पंचायतराज बळकटीच्या दिशेने आणखी एक पाऊल

◆ **वाशीम, २६ फेब्रुवारी**

पंचायतराज व्यवस्था बळकटीकरणासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे.गावातील नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी त्यांनी ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकाऱ्यांचे कार्यालयीन वेळापत्रक जाहीर केले आहे. या वेळापत्रकानुसार हजर न राहणाऱ्या ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकाऱ्यांवर कारवाईचा इशाराही पत्राद्वारे देण्यात आला आहे.

जिल्ह्यात ४९१ ग्रामपंचायती आहेत. काही ग्रामसेवकांकडे एका तर काहींकडे दोन, तीन ग्रामपंचायतींचा प्रभार आहे. ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी हे कोणत्या ग्रामपंचायतमध्ये कधी व कोणत्या वेळी उपस्थित राहतील, याबाबत संबंधित गावातील नागरिक अनभिज्ञ असतात. अनेक ठिकाणी ग्रामसेवकांच्या शोधात नागरिकांना तालुक्याचे ठिकाण गाठावे लागते. याबाबत कधी कधी जिल्हा परिषदेकडेही तक्रारी प्राप्त होतात.

एकापेक्षा अधिक गावांची जबाबदारी तसेच तालुका व जिल्हा स्तरावरील बैठका यामुळेही ग्रामसेवकांना गावात उपस्थित राहण्यास अडचणी येत असल्याची बाब वरिष्ठांच्या निदर्शनास आली आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकाऱ्यांचे मुख्यालयी उपस्थित राहण्याबाबत व आढावा सभेबाबतचे वेळापत्रकच जाहीर केले आहे. त्यानुसार यापुढे दर आठवड्यात केवळ मंगळवार व गुरूवार या दोन दिवशी या वेळेत ग्रामपंचायतींमध्ये उपस्थित राहणे अनिवार्य करण्यात आले. मंगळवार व गुरूवारी आढावा सभा किंवा इतर वरिष्ठ कार्यालयाबाबतचे कामकाज नसल्यास आवश्यकतेनुसार व कामाच्या व्यापानुसार त्या ग्रामपंचायतीमध्ये हजर राहावे, असे निर्देशही सीईओ वैभव वाघमारे यांनी ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकाऱ्यांना दिले.

ज्या सचिवाकडे एकाच ग्रामपंचायतचा प्रभार आहे त्यांनी पूर्ण वेळ ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात उपस्थित राहावे. ज्या सचिवाकडे दोन ग्रामपंचायतीचा प्रभार आहे त्यांनी मूळ ग्रामपंचायतीवर सोमवारी व दुसऱ्या ग्रामपंचायतीवर बुधवारी उपस्थित राहावे, शुक्रवारी सकाळ सत्रात मूळ ग्रामपंचायतीवर व दुपार सत्रात दुसऱ्या ग्रामपंचायतीवर हजर राहावे, असे निर्देश त्यांनी दिले. (तभा वृत्तसेवा)

ग्रामसेवकांच्या सर्व स्तरावरील आढावा बैठका घ्याव्या, याव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारची आढावा बैठक घेऊ नये, असे निर्देश सीईओ वाघमारे यांनी दिले आहेत.

सोमवार, बुधवार व शुक्रवार या तीन दिवशी संबंधित ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकाऱ्यांना सकाळी ९:४५ ते सायंकाळी ६:१५

### दर्शनी भागात फलक लावणे अनिवार्य

ग्रामपंचायतीच्या दर्शनी भागात साडेचार फूट बाय तीन फूट या आकारात ग्रामपंचायतींमध्ये सचिवांच्या उपस्थितीबाबत राहण्या बाबतच्या वेळापत्रकाचे फलक लावणे अनिवार्य करण्यात आले. फलक लावण्यासाठी १ मार्च २०२४ पर्यंत मुदत दिली असून, फलक लावण्याचे काम प्राधान्यक्रमाने पूर्ण करण्याच्या सूचनाही दिल्या. १ मार्चपूर्वी फलक न लावणाऱ्या ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकाऱ्यांना वैयक्तिक जबाबदार धरण्यात येईल, असा इशाराही पत्राच्या माध्यमातून देण्यात आला.

Powered by iDocuments

लोकमत

# ग्रामसेवकांच्या वेळा ठरल्या; गैरसोय टळणार

## सोमवार, बुधवार, शुक्रवारी ग्रामपंचायतीत : मंगळवार, गुरुवारी आढावा बैठका

**वाशिम :** ग्रामपंचायत स्तरावरील कामकाजात सुसूत्रता आणणे आणि नागरिकांची गैरसोय टाळण्याच्या अनुषंगाने ग्रामपंचायतींचे ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकाऱ्यांचे कार्यालयीन वेळापत्रक जिल्हा परिषद प्रशासनाने आखून दिले आहे. या वेळापत्रकानुसार हजर न राहणाऱ्या ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकाऱ्यांवर कारवाईचा बडगाही उगारण्यात येणार आहे.

जिल्ह्यात ४९१ ग्रामपंचायती आहेत. काही ग्रामसेवकांकडे एका तर काहींकडे दोन, तीन ग्रामपंचायतींचा प्रभार आहे. ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी हे कोणत्या ग्रामपंचायतीमध्ये कधी व कोणत्या वेळी उपस्थित राहतील, याबाबत संबंधित गावातील नागरिक अनभिज्ञ असतात. अनेक ठिकाणी ग्रामसेवकांच्या शोधात नागरिकांना तालुक्याचे ठिकाण गाठावे लागते. आता यापुढे नागरिकांची गैरसोय टळणार आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकाऱ्यांचे मुख्यालयी उपस्थित राहण्याबाबत व आढावा सभेबाबतचे वेळापत्रकच जाहीर केले. त्यानुसार यापुढे दर आठवड्यात केवळ मंगळवार व गुरुवार या दोन दिवशी सर्व स्तरांवरील आढावा बैठका होतील. याव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारची आढावा बैठक घेऊ नये, असे निर्देश सीईओ वाघमारे यांनी दिले. सोमवार, बुधवार व शुक्रवार या तीन दिवशी संबंधित ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकाऱ्यांना सकाळी ९:४५ ते सायंकाळी ६:१५ या वेळेत ग्रामपंचायतींमध्ये उपस्थित राहणे अनिवार्य करण्यात आले. मंगळवार व गुरुवारी आढावा सभा किंवा इतर वरिष्ठ कार्यालयाबाबतचे कामकाज नसल्यास आवश्यकतेनुसार व कामाच्या व्यापानुसार त्या ग्रामपंचायतीमध्ये हजर राहावे, असे निर्देशही सीईओ वैभव वाघमारे यांनी ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकाऱ्यांना दिले.

### कसे आहे वेळापत्रक?

- एकाच ग्रामपंचायतीचा पदभार असणाऱ्या ग्रामसचिवांनी संबंधित ग्रामपंचायतीत सोमवार, बुधवार व शुक्रवार, असे तीन दिवस सकाळी ९:४५ ते सायंकाळी ६:१५ या वेळेत उपस्थित राहावे.
- दोन ग्रामपंचायतींचा प्रभार असणाऱ्या ग्रामसचिवांनी सोमवारी मूळ ग्रामपंचायतीत तर बुधवारी दुसऱ्या ग्रामपंचायतीत उपस्थित राहावे. शुक्रवारी सकाळच्या सत्रात मूळ ग्रामपंचायत व दुपारच्या सत्रात दुसऱ्या ग्रामपंचायतीत उपस्थित राहावे.
- तीन ग्रामपंचायतींचा प्रभार असणाऱ्या ग्रामसचिवांनी सोमवारी मूळ ग्रामपंचायतीत, बुधवारी दुसऱ्या ग्रामपंचायतीत तर शुक्रवारी तिसऱ्या ग्रामपंचायतीत उपस्थित राहावे.



ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकाऱ्यांचे मुख्यालयी हजर राहणे व आढावा बैठका याबाबतचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले. त्यानुसार संबंधित ग्रामसेवक/ ग्रामविकास अधिकाऱ्यांनी या वेळापत्रकाचे पालन करावे, संबंधित ग्रामपंचायतमध्ये कार्यालयीन वेळेत उपस्थित रहावे. जे ग्रामसेवक दिलेल्या दिवशी गावात गैरहजर असल्यास सुज्ञ नागरिकांनी जिल्हा परिषद प्रशासनाला कळवावे.

**- वैभव वाघमारे,** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वाशिम

### दर्शनी भागात फलक लावणे अनिवार्य



ग्रामपंचायतीच्या दर्शनी भागात साडेचार फुट बाय तीन फुट या आकारात ग्रामपंचायतींमध्ये उपस्थित राहण्याबाबतच्या वेळापत्रकाचे फलक लावणे अनिवार्य करण्यात आले. फलक लावण्यासाठी १ मार्च २०२४ पर्यंत मुदत दिली असून,फलक लावण्याचे काम प्राधान्यक्रमाने पूर्ण करण्याच्या सूचनाही दिल्या. १ मार्चपूर्वी फलक न लावणाऱ्या ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकाऱ्यांना वैयक्तिक जबाबदार धरण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.

# ग्रामसेवक भेटणार आता गावातच!

## पंचायतराज बळकटीच्या दिशेने सीईओ वाघमारे यांचे आणखी एक पाऊल

देशोन्नती वृत्तसंकलन...

**वाशिम** ▪ गावातील नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी त्यांनी ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकाऱ्यांचे कार्यालयीन वेळापत्रक जाहिर केले आहे. या वेळापत्रकानुसार हजर न राहणाऱ्या ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकाऱ्यांवर कारवाईचा इशाराही पत्राद्वारे देण्यात आला आहे.

जिल्ह्यात ४९१ ग्रामपंचायती आहेत. काही ग्रामसेवकांकडे एका तर काहींकडे दोन, तीन ग्रामपंचायतींचा प्रभार आहे. ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी हे कोणत्या ग्रामपंचायतमध्ये कधी व कोणत्या वेळी उपस्थित राहतील, याबाबत संबंधित गावातील नागरिक अनभिज्ञ असतात. अनेकठिकाणी ग्रामसेवकांच्या शोधात नागरिकांना तालुक्याचे ठिकाण गाठावे लागते. याबाबत कधी कधी जिल्हा परिषदेकडेही तक्रारी प्राप्त होतात. एकापेक्षा अधिक गावांची जबाबदारी तसेच तालुका व जिल्हा स्तरावरील बैठका यामुळेही ग्रामसेवकांना गावात उपस्थित राहण्यास अडचणी येत असल्याची बाब वरीष्ठांच्या निदर्शनास आली आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकाऱ्यांचे मुख्यालयी उपस्थित राहण्याबाबत व आढावा सभेबाबतचे वेळापत्रकच जाहिर केले आहे. त्यानुसार यापुढे दर आठवड्यात केवळ मंगळवार व गुरूवार या दोन दिवशी ग्रामसेवकांच्या सर्व स्तरावरील आढावा बैठका घ्याव्या, याव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारची आढावा बैठक घेऊ नये, असे निर्देश सीईओ वाघमारे यांनी दिले. सोमवार, बुधवार व शुक्रवार या तीन दिवशी संबंधित ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकाऱ्यांना सकाळी ९:४५ ते सायंकाळी ६:१५ या वेळेत ग्रामपंचायतींमध्ये उपस्थित राहणे अनिवार्य करण्यात आले. मंगळवार व गुरूवारी आढावा सभा किंवा इतर वरिष्ठ कार्यालयाबाबतचे कामकाज नसल्यास आवश्यकतेनुसार व कामाच्या व्यापानुसार त्या ग्रामपंचायतीमध्ये हजर राहावे, असे निर्देशही सीईओ वैभव वाघमारे यांनी ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकाऱ्यांना दिले. ज्या सचिवाकडे एकाच ग्रामपंचायतचा प्रभार आहे त्यांनी पुर्ण वेळ ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात उपस्थित राहावे.

ज्या सचिवाकडे दोन ग्रामपंचायतीचा प्रभार आहे त्यांनी मुळ ग्रामपंचायतीवर सोमवारी व दुसऱ्या ग्रामपंचायतीवर बुधवारी उपस्थित राहावे, शुक्रवारी सकाळ सत्रात मुळ ग्रामपंचायतीवर व दुपार सत्रात दुसऱ्या ग्रामपंचायतीवर हजर राहावे.

ज्या सचिवाकडे तीन ग्रामपंचायतीचा चा प्रभार आहे त्यांनी सोमवारी मुळ ग्रामपंचायतीवर बुधवारी दुसऱ्या ग्रामपंचायतीवर व शुक्रवार तिसरी ग्रामपंचायत या प्रमाणे हजर राहावे.वरील वेळापत्रकानुसार विशेष कारणांशिवाय सचिव गावात गैरहजर राहिल्याचे आढळुन आल्यास प्रशासनातर्फे योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. त्यामुळे सचिव गावात हजर नसल्यास संबंधित गावातील लोकांनी जिल्हा परिषद प्रशासनाला महिन्याच्या तिसऱ्या गुरुवारी म्हणजे तक्रारदिनी पुराव्यासह कळवावे असे आवाहन सीईओ वाघमारे यांनी नागरिकांना केले आहे.

नवभारत

**प्रशासन** | पंचायत राज को मजबूत करने की दिशा में CEO का एक और कदम

# अब जिले के गांव में मिलेंगे ग्राम सेवक

■ **वाशिम, ब्यूरो.** जिप के मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे ने पंचायत राज व्यवस्था को मजबूत करने के लिए एक और कदम आगे बढ़ाया है. गाँव के नागरिकों को असुविधा से बचाने के लिए, उन्होंने ग्राम सेवकों और ग्राम विकास अधिकारियों के कार्यालय कार्यक्रम की घोषणा की है. इस कार्यक्रम के अनुसार उपस्थित नहीं होने वाले ग्राम सेवकों, ग्राम विकास अधिकारियों के विरुद्ध पत्र के माध्यम से कार्रवाई करने के संकेत भी दिए है. जिले में 491 ग्राम पंचायतें हैं. कुछ ग्राम सेवक एक तो कुछ दो या तीन ग्राम पंचायतों के प्रभारी हैं. किस ग्राम पंचायत में ग्राम सेवक, ग्राम विकास अधिकारी किस समय उपस्थित रहेंगे इसकी जानकारी संबंधित गांवों के नागरिकों को नहीं है. कई स्थानों पर ग्राम सेवकों की तलाश में नागरिकों को तहसील स्थान तक पहुंचना पड़ता है. इस संबंध में कई बार जिला परिषद को भी शिकायतें मिलती रहती हैं. वरिष्ठजनों के सामने यह बात आई है कि, एक से अधिक गांवों की जिम्मेदारी के साथ तहसील और जिला स्तर पर बैठकों के कारण ग्राम सेवकों को गांव में उपस्थित होने में कठिनाइयों का सामना करना पड़ रहा है. इसलिए जिला परिषद के मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे ने ग्राम सेवकों, ग्राम विकास अधिकारियों की मुख्यालय पर उपस्थिति और समीक्षा बैठक को लेकर कार्यक्रम की घोषणा की है. इसके अनुसार सीईओ वाघमारे ने निर्देश दिया कि, अब से हर सप्ताह केवल मंगलवार और गुरुवार को सभी स्तर के ग्राम सेवकों की समीक्षा बैठकें आयोजित की जाएं और इसके अतिरिक्त कोई भी समीक्षा बैठक नहीं की जाए. संबंधित ग्राम सेवकों/ग्राम विकास अधिकारियों को सोमवार, बुधवार एवं शुक्रवार को प्रातः 9.45 बजे से सायं 6.15 बजे तक ग्राम पंचायतों में उपस्थित रहना अनिवार्य किया गया. सीईओ वैभव वाघमारे ने ग्राम सेवकों, ग्राम विकास अधिकारियों को यह भी निर्देश दिया कि, यदि मंगलवार और गुरुवार को कोई समीक्षा बैठक या अन्य वरिष्ठ कार्यालय संबंधी कार्य नहीं है तो वे आवश्यकता और कार्य के दायरे के अनुसार ग्राम पंचायत में उपस्थित रहे.



■ जिस सचिव के पास एक ही ग्राम पंचायत का प्रभार है उसे ग्राम पंचायत क्षेत्राधिकार में पूरे समय उपस्थित रहना होगा. जिस सचिव के पास दो ग्राम पंचायतों का प्रभार है, उसे सोमवार को मूल ग्राम पंचायत और बुधवार को दूसरी ग्राम पंचायत में उपस्थित होना होगा, सुबह के सत्र में मूल ग्राम पंचायत और दोपहर के सत्र में दूसरी ग्राम पंचायत में उपस्थित होना होगा.

■ जिस सचिव के पास तीन ग्राम पंचायतों का प्रभार है, उसे मूल ग्राम पंचायत में सोमवार को, दूसरे ग्राम पंचायत में बुधवार को तथा तीसरे ग्राम पंचायत में शुक्रवार को उपस्थित रहना चाहिए. यदि यह पाया गया कि सचिव उपरोक्त कार्यक्रम के अनुसार बिना किसी विशेष कारण के ग्राम से अनुपस्थित है तो प्रशासन द्वारा उचित कार्यवाही की जायेगी.

■ अतः यदि सचिव गांव में मौजूद नहीं है तो संबंधित गांव के लोग माह के तीसरे गुरुवार यानी शिकायत दिवस पर जिला परिषद प्रशासन को प्रमाण सहित सूचित करने का आहवान सीईओ वाघमारे ने नागरिकों से किया है.

**दर्शनी भागों में बोर्ड लगाना अनिवार्य:** ग्राम पंचायतों में सचिव की उपस्थिति अनुसूची के संबंध में ग्राम पंचायत के सामने 4.5 फीट गुणा 3 फीट का बोर्ड लगाना अनिवार्य किया गया. बोर्ड लगाने के लिए 1 मार्च 2024 तक की समय सीमा दी गई है और प्राथमिकता के आधार पर बोर्ड लगाने का काम पूरा करने के निर्देश दिए गए हैं. 1 मार्च से पहले बोर्ड नहीं लगाने वाले ग्राम सेवक/ग्राम विकास अधिकारी व्यक्तिगत रूप से जिम्मेदार माने जाने का पत्र के माध्यम से संकेत दिए है.